बृहन्मुंबई महानगरपालिका
क्र.प्रअभि/विनि/ २०५५०/साधारण दि.

प्रअ/विनि/१५४/साधारण २०२०-२१

**विषयः वस्तूंच्या साठयांचे पावसापासून संरक्षण करण्याकरिता तात्पुरत्या पावसाळी छप-या बांधण्याची परवानगी देताना आकारण्यात येणा-या शुल्क रचनेत सुधारणा करण्याबाबत.**

मुंबई महानगरपालिकेने ठराव क्र.११६१ दि.१२.०१.२०१८ नुसार खालील नमूद तक्तयात दिलेल्या पुनर्रचित शुल्काची अनुसूची सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणा-या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून पुढील नविन धोरण निश्चित होईपर्यंत रु.५००/ पर्यंतच्या विद्यमान आकार शुल्कामध्ये १० टक्के इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास सुधारित शुल्क दर पुढील रुपयाच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत व रु.५००/- पेक्षा अधिक विद्यमान आकार शुल्कामध्ये १० टक्के इतकी वाढ करुन येणारे सुधारित शुल्क दर पुढील १०/- च्या पूर्णांकात लागू करण्याबाबत मंजूरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि.१२.०१.२०१८ पासून सुधारित दर लागू करण्याबाबतचे परिपत्रक क्र.प्रअ/विनि/३०४९१/साधा नुसार निर्गमित करण्यात आले होते. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०१९ पासूनच्या सुधारित दराबाबतचे परिपत्रक क्र.प्रअ/विनि/३५७२६/साधारण दि.२२.०३.२०१९ अन्वये प्रसारित करण्यात आले आहे. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०२० पासूनच्या सुधारित दराबाबतचे परिपत्रक क्र.प्रअ/विनि/३५७२६/साधारण दि.२२.०३.२०१९ अन्वये प्रसारित करण्यात आले आहे.

आता, सन २०२१-२२ करिता दि. ०१.०४.२०२१ पासून खालीलप्रमाणे सुधारित दर लागू करण्यात आले आहेत.

| अ क्र + 6 | वर्णन | दि.०१.०४.२०२० पासून लागू केलेले दर शुल्क (रु.) | सन २०२१-२२ या वर्षाकरिता दि.०१.०४.२०२१ पासून लागू करण्यात आलेले दर (म.न.पा. ठराव क्र.११६१) दि.१२.०१.२०१८ शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | खराब हवामान, अतिवृष्टी यापासून संरक्षण, रहिवाशांच्या, जनतेच्या, चित्रपटगृहांच्या/ नाटयगृहांच्या प्रेक्षकांकरिता, कारखान्यातील कामगार,शाळकरी मुले,रुग्णालयातील रुग्ण यांच्या सोयीकरताच बांधलेल्या पावसाळी छप-या जेथे कोणताही जादा नफा किंवा व्यक्तीगत लाभ घेण्याचा हेतू नाही. | रु. ४६ /- प्रति चौ.मी.या दराने शुल्क | रु.५१/- प्रति चौ.मी.या दराने शुल्क |
| २ | मालास नुकसान पोहोचू नये यादृष्टीने संग्रह केलेला माल यंत्र सामग्रीचे संरक्षण करण्याच्या हेतूने बांधलेल्या तसेच एरव्ही व्यवसायिक व औद्योगिक आस्थापनांकडून मोकळया जागेवर चालणारे उपक्रम चालू ठेवण्याच्या हेतूने बांधलेल्या मान्सून छप-या, कारखान्याच्या आवारात मालाचा तात्पुरता संग्रह करण्याकरिता मोकळया जागा तसेच त्यांच्या संरक्षणाकरिता छप-या. | रु.४४६० /-प्रति १० चौ.मी. या दराने अथवा त्यातील काही भाग १०चौ. मी.पेक्षा अधिक क्षेत्राकरिता रु.४४५/ प्रति अतिरीक्त चौ.मी. | रु ४९१०/- प्रति १० चौ.मी.या दराने अथवा त्यातील काही भाग १० चौ.मी.पेक्षा अधिक क्षेत्राकरिता रु.४८९/- प्रति अतिरीक्त चौ.मी. |

मात्र, महानगरपालिकेच्या दि.१० मे, २००२ च्या ठराव क्र.१८५ नुसार, तात्पुरत्या पावसाळी छप-या, त्यांच्या विहित कालावधीनंतर लगेच न काढल्यास व परवानगी देताना घातलेल्या अटींचे उल्लंघन केल्यास, अर्जदाराच्या परवान्याचे नूतनीकरण करताना परवानगी शुल्काइतकाच दंड आकारण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- १३.०१.२०२१<br>कार्यकारी अभियंता<br>(विकास नियोजन) शहर | सही/- १३.०१.२०२१<br>उप प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन)-१ | सही/- १४.०१.२०२१<br>प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन) |